Information Brochure

ADMISSIONS OPEN

Nursery to Std. 10th
2025-26

The Place Every Buddhist Must Visit......

Ayu. Aarohi Akash Chavan
Student of the Year LKG-A
2024-2025
The B.I.S., Umred

U-Dise No. 27190102808
S.S.C. Board : 56.01.353

Panchsheel Bahuuddeshiya Sevabhavi Sanstha, Aurangabad

Reg.No. F13091 & Mah 262/07 Dated 23.3.2007

Add.: The Buddhist International School, Gat No. 404, Behind Lokuttara Buddha Vihar, Ajanta Road, Chowka, Tq. Dist. Aurangabad. 431 008.

पंचशील बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची माहिती

पंचशील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था छ. संभाजीनगर ही सन २००७ मध्ये स्थापन करण्यात आलेली आहे. सदरील संस्थेचे मुख्यालय चौका येथे आहे. सदरील संस्थेचे अध्यक्ष आयु. ॲड. पी. आर. ढाले (बौद्ध) आहेत.

अध्यक्षांचे मनोगत

अध्यक्ष

आयु. ॲड. पद्मशील रामचंद्र ढाले (बौद्ध)

(LL.M. Ex. Judge)

भारतीय राज्यघटना ही बुद्ध, शिव, फुले, शाहू, आंबेडकर (बुद्धिस्ट विचारसरणी) यांच्या विचारसरणीची आहे. हा विचार म्हणजे काय? तर प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार आणि त्यांच्या गुणानुसार मिळायला पाहिजे. याविपरित मनुवादी विचारसरणी आहे. ती म्हणते फक्त ब्राम्हणांना बिना गुणाचे आणि बिना कष्टाचे सर्व कांही द्या.

बस ! याच मनुवादी विचारसरणीला २५०० वर्षापासून विरोध करणारे लोक म्हणजे बुद्धिस्ट लोक. फक्त आमच्या विरोधातच ताकद आहे की ८५% झोपलेल्या बहुजन लोकसंख्येला हे गुलाम ठेवण्यासाठी तयार केलेले षडयंत्र उलगडून दाखवु शकतोत. ते आम्ही दाखवू नये, फक्त यामुळे आम्ही २५०० वर्ष अस्पृश्य होऊन संघर्ष झेलतोय पण वरील महापुरूषांची बुद्धिस्ट विचारसरणी सोडत नाहीत. सध्या तर बाबासाहेबांनी भारताची घटना याच विचारांची दिली आहे. त्यामुळे आता फक्त ती घटना चालविणारे जे ३% लोक असतात ते बनविणे हेच काम बाकी आहे. याच कामाची जिद्द घेऊन आम्ही अहोरात्र मेहनत घेत आहोत.

आज घटनेची अंमलबजावणी करणारे ३% लोक हे मनुवादी विचारसरणीचे आहेत. त्यामुळे ९७% बहुजनांची प्रगती अडथळे सोसत आहे. हे थांबवायचे असेल आणि सर्वांची प्रगती साधून भारतालाही जागतिक महासत्ता बनवायचे असेल तर घटनेची अंमलबजावणी करणारे ३% लोक हे बुद्धिस्ट विचारसरणीचे असणे आवश्यक आहे. तरच हे शक्य आहे.

हे साध्य करण्यासाठीच पुढील BIS NGO ची व्यवस्था उभी केली आहे. याद्वारे भारतातील बौद्धधम्मीयांना एकत्रित करून त्यांच्या मुलांच्या लहानपणीच्या कोऱ्या पाटीवर बुद्धिस्ट विचारसरणीचे बाळकडू देऊन त्यांना भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती बनवून भारताची सर्व राजकीय, सामाजिक सुत्रे कायमस्वरूपी बौद्ध धम्मीयांच्या हाती रहावीत असे उद्दिष्ट ठेवलेले आहे. कारण आधीही सम्राट अशोकाच्या काळातच भारताला 'सोने की चिडीया' म्हणायचे म्हणूनच फक्त बुधिस्ट विचारसरणीच भारतातून सोन्याचा धूर काढू शकते.

यासाठी अध्यक्षांनी स्वतः न्यायाधीश पदाचा राजीनामा देऊन शै.वर्ष २००७-०८ पासून सदरील संस्था स्थापन केलेली आहे. अध्यक्ष स्वतः नवोदय विद्यालय मध्ये शिकलेले आहेत. त्यामुळे पहाटे ५ ते संध्याकाळी १० पर्यंत मुलांची शारीरिक आणि मानसिक वाढ प्रशिक्षित करणे किती आवश्यक आहे याचे महत्व जाणतातः म्हणून B.I.S. चाही तसाच पॅटर्न ठेवलेला आहे.

यानुसार त्यांनी स्वतःच्या मुलांनाही BIS मध्येच शिकविले आहे. आज ते आणि BIS ची अनेक मुले डॉक्टर, वकील, इंजिनियर झालेली आहेत. असेच समाजाच्या सर्व मुलांना घडवावे या उदात्त भावनेने आम्ही कार्य करीत आहोत. म्हणून आपली मुले BIS मध्ये प्रवेशित करा आणि बाबासाहेबांचे भारत बौद्धमय करण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी योगदान दया.

दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल छ. संभाजीनगरची माहिती

पंचशील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित दि. बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल (B.I.S.) च्या प्रथम शाखेची सुरुवात शै. वर्ष २००९-१० पासून स्वतःच्या जागेत करण्यात आली आहे. सदरील शाळा ही महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त भारतातील पहिली बुद्धिस्ट अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था आहे.

BIS चे व्हिजन

* बुद्धिस्ट मुले बुद्धिस्ट शाळेतच गेली पाहिजेत यासाठी प्रयत्न करणे. कारण जर असे झाले नाही तर इतर शाळेत लहानपणीच त्याच्या बुद्धिस्ट होण्यासाठीचा आवश्यक अंकुर खोडून टाकला जातो. ते खालीलप्रमाणे घडते. बुद्धिस्ट विचारसरणी ही 'देव नाही' या सत्यमेव जयतेवर विकसित झालेली मानसिक अवस्था आहे, तर मनुवादी-विचारसरणी ही देवाच्या नावावर मनुवाद्यांनी मलिदा खाणे आणि इतरांनी प्रश्न न करता गुपचुप देणे या देव आहे तो तुमची मुले मारील या भितीच्या द्वारे टॉर्चर झालेली मानसिक दुरावस्था आहे. त्यामुळे आज ९७% लोकसंख्या देव आहे मानतात. त्यानुसार त्यांच्या शाळेत तेच देवभिती दृढ करण्यासाठीचे प्रोग्राम घेतले जातात. हे संस्कार जर बुद्धिस्ट मुलांवर लहानपणी झाले तर त्याला पुढे बुद्धिस्ट बनवणे

अवघड आहे. म्हणून BIS द्वारे बुद्धिस्ट मुले बुद्धिस्ट शाळेतच गेली पाहिजेत हा प्रत्येक बौद्धधम्मीयांपर्यंत मॅसेज गेला पाहिजे. हे व्हिजन आहे.

BIS चे मिशन

आज बौद्धधम्मीय समाज त्यांची विचारसरणी भारतीय घटनेस अभिप्रेत खरी, सायंटिफिक, तर्कशुद्ध, आणि सर्वांच्या प्रगतीला पोषक असणारी असुन सुद्धा सत्ता मनुवादी लोकांच्या हातात असल्यामुळे वरचेवर कमजोर होत चालला आहे. कारण G.S.T. आणि इन्कम टॅक्सचा पैसा तसेच सरकारी जमीनी मनुवाद्यांना मिळत आहेत. म्हणून त्यांचेच खरे पोषण होत आहे त्यामुळे अर्थातच पोषण मनुवादी विचारसरणीला मिळत आहे. त्यामुळे यावर उपाययोजना करणे महत्वाचे आहे.'' असे आहे आपण एकटे काय करू शकतो?'' असे उसासे टाकण्याने काही होणार नाही. तर सध्याच्या परिस्थितीत जे शक्य आहे ते करणे भाग आहे. आपली पर्यायी शिक्षण, रोजगार, व्यापार, माहिती तंत्रज्ञान आणि आरोग्याची समस्या मिटवणारी संपूर्ण पर्यायी व्यवस्था निर्माण करणे होय, तेच करण्यावर BIS खालील प्रमाणे भर देत आहे. आता सरकारवर जराही अवलंबून राहणे नाही आहे. बौद्ध धम्मीयांना एवढे सक्षम बनविणे आहे की सरकारला आपल्यावर अवलंबून रहावे लागेल हे घडणार आहे फक्त खालील आपल्या BIS च्या NGO तून.

अ) भारतातील प्रत्येक तालुक्यात BIS ची इमारत १० एकर जागेवर उभा करणे. त्याद्वारे गणित, सायन्स मुलांना शिकवून जपान, चीन सारखे विज्ञान प्रिय विद्यार्थी बनवणे, मेडीकल कॉलेज पर्यंत सर्व शिक्षण देणे अशी शिक्षणाची समस्या मिटविणे.

ब) तिथेच आपल्या मुलांना शिकविण्यासाठी आपलेच शिक्षक, पालक आणि सर्व कर्मचारी यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी बुद्धिस्ट कॉलनीज बनविणे याद्वारे रोजगार आणि आरोग्याचा प्रश्न मिटेल.

क) बुद्धिस्टस्टार ग्रुप ऑफ कंपनीजच्या मार्ट. पब्लिकेशन, कनेक्ट, हॉटेल्स, कन्स्ट्रक्शन्स, मिडीया, हॉस्पीटल्स द्वारे लागणारे सगळे साहित्य आपणच निर्माण करणे. यानुसार स्थायी रोजगार मिळून बौद्धधम्मीय आर्थिक दृष्टीने सक्षम होतील. सदरील आर्थिक सक्षमतेमुळे कुणीही सत्तेत आले गेले तरी फरक पडणार नाही. पण कोण सत्तेत येईल हे वेगळे सांगण्याची गरज नसावी.

ड) सदरील BIS ला सर्व बौद्धधम्मीयांनी लोकशाही पद्धतीने वर्षानुवर्षे चालवित रहावे याकरिता सर्व बौद्धधम्मीयांना आजीवन सभासद बनवून त्यांच्या सल्ल्याने BIS चालविता यावी याकरिता खालील संलग्न संस्था बनविली आहे.

22 प्रतिज्ञा

Reg. No. महा 348/2022

एफ-28028/औरंगाबाद

देव नाही



बावीस प्रतिज्ञा अनुसरण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था
औरंगाबाद

Estd. 23-09-2022

बावीस प्रतिज्ञा अनुसरण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची माहिती

सदरील संस्था मूळ संस्था पंचशील बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचीच संलग्न संस्था आहे. MOU द्वारे दोन्ही संस्था एकमेकांचे स्वतंत्र विषयांचे काम पार पाडण्यासाठी जुडलेल्या आहेत. सदरील संस्थेचा मुख्य उद्देश बौद्धधम्मीयांना कधीही २२ प्रतिज्ञांचा विसर पडू देऊ नये. त्याचा प्रचार प्रसार सतत चालत राहिला पाहिजे त्यासाठी जी BIS या २२ प्रतिज्ञा आपल्या रोजच्या धम्मपाठात घेते. त्यामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करणे होय.

बावीस प्रतिज्ञाचे मुख्य कार्य

सर्व बौद्ध बांधवांच्या आर्थिक मदतीने महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात एक याप्रमाणे ४०० BIS च्या एकसारख्या खालील प्रमाणे इमारती उभा करणे तिचे संचलन सर्व सभासदांच्या सामूहिक निर्णयाद्वारे करत राहणे.

सदरील इमारती या बौद्धधम्मीयांच्या त्या त्या तालुक्यात आश्रयाचे स्थान ठरतील. बौद्धधम्मीय आपल्या सर्व अडचणींचे निराकरण करण्यासाठी BIS कडे आशेने पाहतील अशी व्यवस्था निर्माण करीत आहोत. त्यासाठी खालील प्रमाणे कृती करा.

A) BIS NGO मध्ये सामील होण्यासाठी प्रथम तुम्हाला या संस्थेत आजीवन सदस्य फीस रु. ५०००/– भरून सभासद व्हावे लागते. ती संस्थेच्या खालील अकाऊंटवर भरावी.

Account Name	:	Bawis Pratidnya Anusaran Bahuuddeshiya Sevabhavi Sanstha
Bank Name	:	Kotak Mahindra Bank Ltd.
Branch Name	:	Town Center Aurangabad.
Account Number	:	8348276699
IFSC Code	:	KKBKO001949
Type	:	Current.

B) आपण सभासद होण्यासाठीचा निर्णय घेतल्यानंतर प्रथम आमच्या अधिकृत शाखा अध्यक्ष किंवा कौन्सील मेंबर यांच्या मार्फत खालील प्रमाणे मिटींगला येवून प्रथम सर्व माहिती पाहून घ्यावी. त्यानंतरच आपणास इतर दोन सदस्यांच्या शिफारसी नंतर सदस्यत्व बहाल केले जाते. आपण सदस्य झाल्यावर सर्व निर्णय प्रक्रियेत वोटिंगचा अधिकार मिळतो.

C) सदरील सर्व भारतातील बौद्धधम्मीयांना एकत्र जोडून सभासद करण्यासाठी संस्थेद्वारे सन २०१५ मध्ये प्रा. सुषमा अंधारे यांच्या

हस्ते भारतीय बुद्धिस्ट संघाची स्थापना खालील प्रमाणे करण्यात आली आहे.

भारतीय बुद्धिस्ट संघाची माहिती

बावीस प्रतिज्ञा अनुसरण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेद्वारे भारतीय बुद्धिस्ट संघाची स्थापना केलेली आहे.

आयु. इंजि. महेंद्र बारसागडे
अध्यक्ष, भारतीय बुद्धिस्ट संघ

भारतीय बुद्धिस्ट संघाचे अध्यक्ष आयु. इंजि. महेंद्र बारसागडे सर आहेत. सरांनी संपूर्ण आयुष्य बुद्धिझम च्या वाढीसाठी वाहून घेतलेले आहे. सर लाखांदूर येथील BIS च्या शाखेचे संचालक आहेत. तसेच त्यांनी स्वतःच्या पैश्यातून भागडी येथे संपूर्ण विहारच बांधले आहे. संपूर्ण वर्षभर श्रामणेर शिबीर, सर्व महापुरूष जयंती, संविधान गौरव दिन, पाली भाषा संवर्धन इ. कार्यक्रम सरांचे चालू असतात. BIS च्या महाराष्ट्रभर इमारती उभा करण्यासाठी लागणारा निधी जमा करण्याची जबाबदारी संस्थेद्वारे सरांवरही देण्यात आलेली आहे.

अनाथपिंडक स्कॉलरशिप

भारतीय बुद्धिस्ट संघाद्वारे बुद्धिस्ट होतकरू मुलांना वरील संस्थेच्या आजीवन सदस्यच्या फंडद्वारे जमा झालेल्या रकमेतून BIS च्या हॉस्टेल तसेच शाखांच्या शाळांच्या ॲडमिशन्स साठी रु. ६०,०००/ आणि रु. २०,०००/ ची अनुक्रमे अनाथपिंडक स्कॉलरशिप दिली जाते.

भारतीय बुद्धिस्ट संघाद्वारे मासिक बैठकांचे आयोजन

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी मुख्यालयात सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत सर्व सभासदांच्या उपस्थितीत नियमित मासिक बैठका घेतल्या जातात. महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या सभासदांच्या अडचणी सोडविल्या जातात.

सर्व महाराष्ट्रभर अश्याच मिटींगचे आयोजन करून सभासदांची संख्या वाढविणे तसेच बौद्धधम्मीयांनी आपली स्वतःची स्वतंत्र अशी ओळख निर्माण करणेसाठी आचरणात्मक काय करावे आणि काय करू नये याबद्दलचे निर्णायक मत देण्यासाठी महाराष्ट्र बुद्धिस्ट सभागृहाची स्थापना करण्यात आलेली आहे.

MBS महाराष्ट्र बुध्दिस्ट सभागृह

महाराष्ट्र बुद्धिस्ट सभागृहाची माहिती

बावीस प्रतिज्ञा अनुसरण बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेद्वारे महाराष्ट्र बुद्धिस्ट सभागृहाची स्थापना करण्यात आलेली आहे.

आयु. डॉ. अभिजीत मनवर
अध्यक्ष, महाराष्ट्र बुद्धिस्ट सभागृह

महाराष्ट्र बुद्धिस्ट सभागृहाचे अध्यक्ष आयु. डॉ. अभिजीत मनवर सर आहेत. सर कळमनुरी येथील BIS शाखेचे संचालक आहेत. तसेच संपूर्ण आयुष्य बहुजन समाजाच्या हाती सत्तेची चावी यावी याकरिता समर्पित केलेले आहे. सरांवर संस्थेच्या महाराष्ट्रभर सभा आयोजित करणे. त्यासाठी निधी जमा करणे याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. त्यासाठी प्रत्येक सदस्य वार्षिक बुद्धिस्ट टॅक्स म्हणून रु. १०००/– बाविस प्रतिज्ञा संस्थेच्या वरील अकाऊंटवर जमा करीत असतात. या रकमेतून सर्व सभांचा तसेच त्यासाठी येणाऱ्या सदस्यांचा T.A.D. A. चा खर्च भागविला जातो.

वरील सर्व जुडलेल्या सदस्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करण्यासाठी खालील प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. ज्याद्वारे बौद्धधम्मीयांच्या अनेक महत्त्वाच्या गरजांची पूर्तता व्यावसायिक पद्धतीने पूर्ण केली जाते.

BUDDHISTSTAR GROUP OF COMPANIES

बौद्धधम्मीयांच्या, पालकांच्या सर्वांगीण विकासासाठी एकुण ८ कंपनी मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेयर्सकडे रजिस्टर्ड आहेत. त्यांची माहिती तसेच त्यांच्या मॅनेजिंग डायरेक्टर्सची माहिती खालील प्रमाणे आहे.

BUDDHISTSTAR CONSTRUCTIONS. Pvt. Ltd.
Reg. No. U45309MH2021PTC368109
PAN No. AAKCB1655R
TAN No. NSKBO6291F

Registered Office – Gat. No. 404, Near, The Buddhist International School Chauka, Aurangabad, Behind Lokuttara Buddha Vihar, Phulambri Road, Chauka. Tq. And Dist. Aurangabad. 431008.
Mob. No. 9822337820, 9823832638, 9405964425. email. padmasheel1976@gmail.com.

बुद्धिस्टस्टार कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि. कंपनीची माहिती

व्यावसायिक पद्धतीने BIS साठी लागणाऱ्या भक्कम ४०० इमारतीचे निर्माण करणे. त्यासाठी निधी दिलेल्या शेअरहोल्डर्सना त्याचा सतत मोबदला मिळत रहावा याकरिता सदरील कंपनीची निर्मिती केलेली आहे.

आयु. डॉ. सिद्धार्थ लवू तांबे

मॅनेजिंग डायरेक्टर, बुद्धिस्टस्टार कन्स्ट्रक्शन्स प्रा.लि.

आयु. डॉ. सिद्धार्थ लवू तांबे सर, ओरोस येथील प्रसिद्ध नेत्र तज्ञ आहेत. ते संस्थेच्या ओरोस येथील शाखेचे संचालक आहेत. तसेच सर्व महाराष्ट्रातील शाखांसाठी जमीन घेणे, त्यावर इमारत बांधणे आणि २५% रॉयल्टी घेवून BIS ला सुपुर्द करणे हे काम ते बुद्धिस्टस्टार कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून पार पाडत आहेत. आज रोजी कंपनी द्वारे सिंधुदुर्ग जिल्हयातील ओरोस शाखेसाठी आणि चंद्रपूर जिल्हयातील गोंडपिपरी शाखेसाठी जमीनी घेण्यात आलेल्या आहेत.

आम्ही आपल्या सर्वांना सदरील कंपनीचे शेअर्स घेवून सदरील कामासाठी भागीदार बनावे असे आवाहन करीत आहोत. सदरील शेअर्सची रक्कम कंपनीच्या खालील अकाऊंटवर जमा करावी.

Buddhiststar Constructions Pvt. Ltd.
Acc. NO : 3746152712
IFSC Code : KKBK0000693
Bank Name : Kotak Mahindra Bank
Branch Add : Kandi Tower Aurangabad

Buddhiststar Mart Pvt. Ltd.

CIN-U47820MH2023PTC399184

indwayravindra@gmail.com 9892060842

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

बुद्धिस्टस्टार मार्ट प्रा. लि. कंपनीची माहिती

आयु. रविंद्र इंदवे सर

बुद्धिस्टस्टार मार्ट प्रा.लि.
मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. रविंद्र इंदवे सर, उल्हासनगर येथील BIS च्या शाखेचे संचालक आहेत. सदरील कंपनीद्वारे BIS च्या सर्व शाखांना उत्तम क्वालिटीचे युनिफॉर्म, स्कुल बॅग, स्पोर्टस ड्रेसेस, बुद्धिस्ट मूर्ती, जयंती ड्रेसेस, जयभीम टी शर्टस् पुरविले जातात.

सदरील कंपनीचे शेअर्स घेवून आपण भागीदार व्हावे. शेअर्सची रक्कम कंपनीच्या खालील खात्यावर भरावी.

Buddhiststar Mart Pvt. Ltd.
Acc. NO : 7249459354
IFSC Code : KKBK0001949
Bank Name : Kotak Mahindra Bank
Branch Add : Town Center, Aurangabad

Buddhiststar Publications Pvt. Ltd.

CIN-U22219MH2023PTC398033

baldeoingale@gmail.com 9765371196

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

बुद्धिस्टस्टार पब्लीकेशन्स प्रा.लि.ची माहिती

आयु. बलदेव इंगळे सर

बुद्धिस्टस्टार पब्लीकेशन्स प्रा.लि.
मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. बलदेव इंगळे सर हे सदरील कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. सदरील कंपनीद्वारे बुद्धिस्ट मुव्हमेंटसाठीची खालील पुस्तके मोठ्या प्रमाणात प्रकाशित केली जातात. १) शेतकऱ्यांचा आसूड २) गुलामगिरी ३) शुद्र पूर्वी कोण होते. ४) क्रांती आणि प्रतिक्रांती ५) हिंदुत्वाचे कोडे ६) बुद्ध आणि त्यांचा धम्म

सदरील कंपनीचा वरील ६ पुस्तके प्रत्येक बौद्ध धम्मीयांच्या घरात असावीत असा संकल्प आहे. सदरील कंपनीद्वारे दरवर्षी बुद्धिस्ट डायरी तसेच प्रसिद्ध 'देव नाही' हे कॅलेंडर प्रकाशित केले जाते.

सदरील कंपनीद्वारे बुद्धिस्ट सिलॅबस तयार करण्यात आलेला आहे. त्यामुळे बुद्धिस्ट मुलांवर कोणतेही हिंदू संस्कार होण्यापासून रोखले जात आहेत. तरी सदरील कंपनीचे शेअर्स घेवून आपण भागीदार व्हावे. शेअर्स कंपनीच्या खालील खात्यावर भरावेत.

Buddhiststar Publications Pvt. Ltd.
Acc. No. : 7249459651
IFSC Code : KKBK0001949
Bank Name : Kotak Mahindra Bank
Branch Add : Town Center, Aurangabad

Buddhiststar Connect Pvt. Ltd.

CIN-U85500MH2023PTC398844

nitinsonawane2904@gmail.com 9657554867

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

आयु. नितीन सोनवणे सर

बुद्धिस्टस्टार कनेक्ट प्रा. लि.

मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. नितीन सोनवणे सर हे सदरील कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. सदरील कंपनीद्वारे महाराष्ट्रातील सर्व बुद्धिस्टांचे रजिस्ट्रेशन नंबर देऊन नोंदणी केली जाते. तसेच त्यांच्या व्यवसायाच्या माहितीची जाहिरात ॲपद्वारे दिली जाते. तसेच बुद्धिस्ट रिश्ते ॲपद्वारे विवाह इच्छुकांचे विवाह जुळविणेसाठी रजिस्ट्रेशन केले जाऊन त्यासाठी सॉफ्टवेअर विकसित केले जात आहे.

सदरील कंपनीद्वारे BIS मुख्यालयास सर्व संस्था, कंपनी आणि शाखा या कायम जुळून रहाव्यात याकरिता सॉफ्टवेअर विकसित केले आहे.

सदरील कंपनीचे शेअर्स घेऊन आपण भागीदार व्हावे. शेअर्स कंपनीच्या खालील खात्यावर भरावेत.

Buddhiststar Connect Pvt. Ltd.
Acc. No. : 7249459330
IFSC Code : KKBK0001949
Bank Name : Kotak Mahindra Bank
Branch Add : Town Center, Aurangabad

Buddhiststar Educations Pvt. Ltd.

CIN-U85101MH2024PTC422158

sarvind07@gmail.com 9405964425

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008



आयु. प्रा. अरविंद साळवे सर

बुद्धिस्टटार एज्युकेशन्स प्रा.लि.

आयु. प्रा. अरविंद साळवे सर नेट सेट उत्तीर्ण प्राचार्य होते. त्यांनी आपल्या प्राचार्यपदाचा राजीनामा देऊन हे समाजसेवेचे काम हाती घेतलेले आहे. सर पिंप्री चिचवड पिंपळे गुरव येथील शाखेचे संचालक आहेत. सदरील कंपनीद्वारे महाराष्ट्रातील सर्व BIS च्या शाखांचे Nursery to 12th पर्यंतच्या शाळांची फीस जमा करणे तसेच सर्व बिले वेळेवर देणे हे प्रमुख काम पार पाडले जाते. त्याचबरोबर खालील कामेही पार पाडली जातात.

१) क्वालिटी एज्युकेशन देणे. त्यासाठीच्या आवश्यक परीक्षा घेणे.
२) मार्कमेमो, टी. सी. चे वितरण करणे.
३) शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे नियमित पगार करणे.
४) सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे.
५) विद्यार्थ्यांचे जनरल रजिस्टर मेंटेन करणे.
६) शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे रोज उपस्थिती रिपोर्ट सादर करणे.
७) महाराष्ट्रातील सर्व शाखांच्या वाढीसाठी प्रचार साहित्य तयार करणे तसेच जाहीराती देणे.
८) विविध शालेय उपक्रमांचे नियोजन करणे
९) सर्व शाळांच्या गॅदरिंग, स्पोर्टस, ट्रिप यांचे नियोजन करणे.
१०) परीक्षांचे वेळापत्रक ठरविणे आणि परीक्षा घेऊन रिझल्ट घोषित करणे.

या सर्व कामांबद्दल प्रत्येक शाखेकडून सदरील कंपनीस टर्न ओव्हर च्या २% रेव्हेन्यू मिळतो. करिता सदरील कंपनी सर्व्हिस प्रोव्हायडर असल्यामुळे सदैव प्रॉफीट मध्ये राहते. तरी सदरील कंपनीचे शेअर्स घेऊन आपण भागीदार व्हावे. शेअर्स कंपनीच्या खालील खात्यावर भरावेत.

Buddhiststar Educations Pvt. Ltd.
A/c. No. : 9049023728
IFSC Code : KKBK0001949
Bank Name : Kotak Mahindra Bank
Branch Add : Town Center, Aurangabad

Buddhiststar Media Pvt. Ltd.

CIN-U18111MH2023PTC398307

adityasalvepc@gmail.com 9665384425

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

आयु. आदित्य साळवे सर

B.B.A. (C.A.)

बुधिस्टस्टार मिडीया प्रा.लि. मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. आदित्य साळवे सरांनी दि. बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व ब्रँचेसना यू-ट्युब वर महत्वाचे स्थान मिळवून दिलेले आहे.

सदरील कंपनीद्वारे महाराष्ट्रातील BIS च्या सर्व शाखांची ॲडमिशन्स ओपन ची जाहिरात, विविध कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण, स्पर्धांचे आयोजन इ. यु. ट्युबच्या माध्यमातून केले जाते.

A) प्रत्येक बौद्धधम्मीयास बुद्धिस्ट सांस्कृतिक कार्यक्रम कसे घ्यायचे याचे प्रशिक्षण यातून दिले जाते.

B) सन २०१४ पासून गोदी मिडीया आणि व्हॉटसअॅप युनिव्हर्सिटीचे न्युज चॅनेल यांचेच कार्यक्रम चालू असल्यामुळे लोकांनी टी.व्ही. पाहणे बंद केलेले आहे. त्यामुळे पर्याय याद्वारे आम्ही निर्माण केलेला आहे. प्रत्येक बौद्धधम्मीयास त्यांच्या विचार सरणीनुसार कार्यक्रम पाहता यावेत यासाठी सदरील कंपनी न्युज तसेच इतर कार्यक्रम घेत असते. सदरील कंपनीस शाळेचे विद्यार्थी आणि पालक यांच्याकडून जाहीरातीद्वारे नियमित कस्टमर सपोर्ट असल्यामुळे रेव्हेन्यू सतत मिळतो. करिता सदरील कंपनी सर्व्हिस प्रोव्हायडर असल्यामुळे सदैव प्रॉफीट मध्ये राहते. तरी सदरील कंपनीचे शेअर्स घेऊन आपण भागीदार व्हावे. शेअर्स कंपनीच्या खालील खात्यावर भरावेत:

Buddhiststar Media Pvt. Ltd.

Acc. No.	:	7249459347
IFSC Code	:	KKBK0001949
Bank Name	:	Kotak Mahindra Bank
Branch Add	:	Town Center, Aurangabad

Buddhiststar Hospitals Pvt. Ltd.

CIN-U86100MH2023PTC398776

abhijeetmanwar00@gmail.com 9975033939

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

आयु. डॉ अभिजित मनवर सर

बुद्धिस्टटार हॉस्पीटल्स प्रा.लि. मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. डॉ. अभिजित मनवर सर The B.I.S. कळमनुरी शाखेचे संचालक आहेत.

सदरील कंपनीद्वारे महाराष्ट्रात प्रत्येक जिल्हयात एक मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल उघडले जाणार आहे.

सदरील कंपनीस दुरदृष्टीने आतापासून पुढील १० वर्षात सदरील टारगेट साध्य करायचे आहे. तरी सदरील कंपनीचे शेअर विकत घेऊन आपण भागीदार व्हावे.

Buddhiststar Hotels Pvt. Ltd.

CIN-U55101MH2023PTC399153

prakamble73@gmail.com 9870585758

REGISTERED ADDRESS : GAT NO 404 JALGAON ROAD CHOUKA, CHH SAMBHAJINAGAR, MAHARASHTRA, 431008

आयु. प्रदीप कांबळे सर

बुद्धिस्टस्टार हॉटेल्स प्रा. लि.

मॅनेजिंग डायरेक्टर

आयु. प्रदीप कांबळे सर The B.I.S. पनवेल कळमनुरी शाखेचे संचालक आहेत.

सदरील कंपनीद्वारे महाराष्ट्रातील प्रत्येक शाखेसाठीच्या हॉस्टेलसाठी मुलांचे राहण्याचे हॉस्टेल आणि त्यांची मेस चालवणे तसेच येणाऱ्या गेस्टची जेवण राहणेची सोय करणे हे प्रमुख काम आहे. B.I.S. च्या शाळां आणि कॉलेजेस मधील विद्यार्थ्यांना क्वालिटी जेवण आणि स्वच्छ राहण्याची व्यवस्था हॉटेल्स प्रमाणेच या कंपनी द्वारे केली जाते.

सदरील कंपनीस शाळेचेच विद्यार्थी आणि पालक नियमित कस्टमर सपोर्ट असल्यामुळे रेव्हेन्यू सतत मिळतो, करिता सदरील कंपनी सर्व्हिस प्रोव्हायडर असल्यामुळे सदैव प्रॉफीट मध्ये राहते. तरी सदरील कंपनीचे शेअर्स घेवुन आपण भागीदार व्हावे.

गुंतवणूक स्कीम्स्

वरीलप्रमाणे B.I.S. स्कुल महाराष्ट्रातील सर्व बौद्ध धम्मीयांच्या विकासासाठी संस्था आणि कंपनीचे जाळे विणत आहेत. ज्यातुन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे. बौद्ध धम्मीयांचा संस्थात्मक विकास होत आहे.

म्हणून महाराष्ट्रातील तमाम बौद्धधम्म बांधवांना याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूलच्या संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यांच्या ठिकाणी एक याप्रमाणे ४०० शाखांची वरील प्रमाणे एकसारखी इमारत बनवायची आहे.

आपणास भारत बौद्धमय करायचा असेल तर लहानपणापासूनच मुलांना बुद्ध धम्म आणि सी.बी.एस.ई. यांची उत्कृष्ट सांगड घालून शिक्षण दिले गेले पाहिजे. यासाठी सर्व तालुक्यात अशा कायमस्वरूपी इमारती उभा राहणे गरजेचे आहे. त्यामुळे आम्ही पूर्णतः मान्यता प्राप्त बुद्धिस्ट अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था आपल्यासाठी खालील स्कीम्स घेऊन आलेलो आहोत.

सदरील स्कीम्स द्वारे आम्ही मध्यस्थी बँक दूर केलेली आहे. मध्यस्थी बँक तुमच्याकडून कमी व्याजदर ८% द.सा.द.शे. देऊन F.D. घेते. त्यावर २४% व्याज दर आकारून कर्ज देते. मधील १६% प्रॉफीट हा बँका घेतात. इथे आम्ही बँकांना बाजूला सारून त्यांचा प्रॉफीट तुम्हाला आम्हाला राहील अश्या स्कीम्स घेवून आलेलो आहोत.

सम्यक FD मासिक प्राप्ती योजना

आपणास आमच्याकडे रु. ३०,०००/-च्या पटीत रक्कम गुंतवावी लागते. कमीतकमी कालावधी ३ महिनेचा असतो, त्यावर तुम्हाला द.सा.द.शे. १६% दराने दरमहा व्याज मिळत राहते. उदा: रु. ३,००,०००/- ठेवल्यास प्रति महा रु. ४०००/- व्याज १ तारखेला भेटत राहते.

उत्कर्ष दाम दुप्पट योजना

आपणास आमच्याकडे रु. १०,०००/-च्या पटीत रक्कम गुंतवावी लागते. सदरील रक्कम आम्ही आपणास साडेतीन वर्षात दामदुप्पट करून देतो. सदरील रकमेतून आम्ही इमारती बांधतो. झालेला फायदा प्रत्यक्ष आपणास पोहोचवतोत. यानुसार सर्वांनी बँकाना दुर करून आपल्या समाजाच्या शाळांच्या इमारती व्हाव्यात तसेच स्वतःच्याही सेव्हिंग्जवर जास्त फायदा व्हावा म्हणून आम्हाला जास्तीत जास्त गुंतवणुक देण्याचे याद्वारे आवाहन करीत आहोत. आपणास सर्व रकमेचे धनादेश, पावती, सर्टीफिकेट तसेच रु. १००/- च्या बाँण्डवर करारपत्र करुन दिले जाते.

धम्मदान

बुद्धिस्ट समाजातील दानशूर व्यक्तीनी BIS च्या ऐतिहासिक आणि पुढील पिढीला निर्णायक वळण देण्याच्या कार्याला यशस्वी बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत करावी तसेच लायब्ररीसाठी मोठ्या प्रमाणात पुस्तके डोनेट करावीत असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

संस्थेस आपण दिलेल्या धम्मदानामुळे आपणास इन्कम टॅक्स मधून सूट मिळते. त्यासाठी आपण संस्थेस दिलेल्या धम्मदानाची पावती घेऊन आपल्या C.A. कडे दयावी त्यावर संस्थेचे खालील 12AA & 80G चे नंबर असतात, त्याद्वारे तुम्हाला इन्कम टॅक्स मध्ये सुट मिळते.

12AA NO : AACTP9279NE241
80 G No. : AACTP9279NF241

धम्म कक्षावरती नाव

जे धम्मबांधव रुपये एक लाखाच्या वरती धम्मदान करतात त्यांचे नाव येथील धम्मकक्षास म्हणजे वर्गखोलीस दिले जाते.

आयु डॉ. सुषमा माटे
मुंबई

आयु डॉ. सुषमा माटे मुंबई यांनी अश्याच प्रकारे दि. १२/८/२०२४ रोजी रुपये एक लाखाचे धम्मदान संस्थेस दिले आहे. त्यांचे नाव std. Ist च्या क्लास रुमला दिलेले आहे. The B.I.S. आपली शतशः ऋणी आहे.

अशाच प्रकारे समाजातील बांधवांनी पुढाकार घेऊन डिजीटल क्लास रूम तयार करण्यासाठी धम्मदान द्यावे ही नम्र विनंती. आपल्या पुढील पिढीला भारत बौद्धमय करण्यासाठी हातभार लावण्यासाठी धम्मदान देऊन हातभार लावावा.

प्रशासन

आयु. आशा ढाले.
B.A.B.Ed.

सदरील सर्व BIS च्या NGO च्या प्रशासनाची जबाबदारी आयु. आशा ढाले मॅडमवरती आहे. सर्व संस्था त्यांच्याशी MOU असलेल्या कंपनी यामध्ये असणारे सर्व प्रशासकीय कामकाज तसेच हेड ऑफीसच्या मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

आम्ही STUDLURE हा शैक्षणिक उपक्रम राबवित आहोत. त्याची सविस्तर माहिती खाली दिलेलीच आहे.

आम्ही १० वी बोर्डामध्ये ८५% च्या वर मुलांना मार्क पडले नाहीत तर २५% ट्युशन फीस नुकसान भरपाई म्हणून परत करतोत. दि. बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल तर्फे रु. १०० च्या बॉण्डवर अॅग्रीमेंट करून देतो. अशी आपल्या मुलांच्या भविष्याची आम्ही हमी घेत असल्यामुळे आपण सर्वांनीच आपली मुले हॉस्टेल मध्ये प्रवेशित करावीत.

Fees Structure 2025-26

१) सर्वांना वन टाईम ॲडमिशन फीस रु. २०००/- स्वतंत्रपणे भरावी लागते. २) स्टेशनरीच्या खर्चासाठी डिपॉझीट रु. ५०००/- ठेवावे लागतात. ३) मेडीकलच्या खर्चासाठी डिपॉझीट रु.२०००/- ठेवावे लागतात. ४) ट्रिप, गॅदरिंग आणि स्पोर्टस्‌ची त्या त्या वेळी निर्धारित होणारी फीस वेगळी भरावी लागते.

Class	Tuition Fees	Hostel Fees	Mess Fees	Total fees	30th June 20% Disc.	Bal. Fees	31st July 15% Disc.	Bal. Fees	31st Aug 10% Disc.	Bal. Fees
Ist	15000	10,000	30,000	55000	11000	44000	8250	46750	5500	49500
2nd	16000	10,000	30,000	56000	11200	44800	8400	47600	5600	50400
3rd	17000	10,000	30,000	57000	11400	45600	8550	48450	5700	51300
4th	18000	10,000	30,000	58000	11600	46400	8700	49300	5800	52200
5th	19000	10,000	30,000	59000	11800	47200	8850	50150	5900	53100
6th	20000	10,000	30,000	60000	12000	48000	9000	51000	6000	54000
7th	21000	10,000	30,000	61000	12200	48800	9150	51850	6100	54900
8th	22000	10,000	30,000	62000	12400	49600	9300	52700	6200	55800
9th	23000	10,000	30,000	63000	12600	50400	9450	53550	6300	56700
10th	25000	10,000	30,000	65000	13000	52000	9750	55250	6500	58500

STUDLURE

BIS ची वेगळी ओळख आणि स्पेशालिटी काय असेल तर ती म्हणजे STUDLURE प्रोग्राम. BIS शिवाय कुणीही अशा पद्धतीचा प्रोग्राम राबवू शकत नाही. आम्हाला आमच्या १७ वर्षाच्या अनुभवातुन डेव्हलप केलेल्या प्रोग्राम वर सातत्याने चालण्याचा सेल्फ कॉन्फीडंस असल्यामुळे फक्त आम्हीच हे चॅलेंज घेऊ शकतो.

STUD+LURE चा अर्थ

STUD+LURE (Study+Lure) म्हणजे अभ्यास करण्यासाठी लालूच देण्याची पद्धत. इथे तिन्ही घटक अ) विद्यार्थी ब) पालक क) संस्था यांना नीट काम करण्यासाठी लालूच दिलेली आहे.

अ) विद्यार्थी म्हणतील ९५% च्या वर मार्क मिळाले तर रु. १,००,०००/- भेटतील.

ब) पालक म्हणतील मुलांना आता ८५% च्या वर कसेच पडत नाहीत पाहतो. नाहीतर रु. ५०,०००/- संस्थेकडून वसूल करतो.

क) संस्था म्हणेल नीट शिकवले तर रु. ५०,०००/- वाचतील. म्हणून तिन्ही घटक अलर्ट राहून काम करतील.

प्रतित्यसमुत्पादाचा सिद्धांत

आपण बौद्धधम्मीयांस बुद्धांनीच प्रतित्यसमुत्पादाचा सिद्धांत दिलेला आहे. यानुसार प्रत्येक गोष्टीस कारण असते. त्यानुसार आम्ही विद्यार्थ्यांना अभ्यास करुन ९५% च्या वर मार्क मिळविण्यासाठी कारण निर्माण करतोत.

यामुळे तो पालकांनी म्हटले म्हणून, कुणासाठी तरी बळेने करायचे म्हणून अभ्यास करीत नाही तर तो स्वतःसाठी अभ्यास करतो.

रु.१०० च्या बॉण्डवर ८५% ची गॅरंटी

आजकाल १० वी बोर्डामध्ये ७५% पर्यंत कुणीही इंटर्नल मुळे आरामात मार्क मिळवितो पण आम्ही इथे आपल्या पाल्यास ८५% च्या वर मार्क मिळवून देण्याची हमी रु. १००/- च्या बॉण्डवर घेत आहोत. आणि जर मिळाले नाहीत तर आपण भरलेल्या ट्युशन फीसच्या २५% रक्कम आपणास परत दिली जाते. तसेच बॉण्डवर लिहून दिले जाते.

STUDLURE प्रोग्राममध्ये भाग घेण्याची पद्धत

A) आपल्या पाल्यास BIS मध्ये Std. 1 st to 5th मध्येच प्रवेश द्यावा लागतो. त्यापुढील वर्गात प्रवेश घेणाऱ्यांना सदरील प्रोग्रामचा लाभ घेता येत नाही. कारण आम्हांला मुलांना घडविण्यासाठी किमान ५ वर्ष लागतात. तरच अश्या मुलांची आम्ही हमी घेवू शकतोत. जे आमच्याकडे सातत्याने कमीत कमी ५ वर्ष शिकत आहेत.

B) प्रवेश देण्यापूर्वी आम्ही टेस्ट घेतोत. साधारण बुद्धयांक असलेल्या विद्यार्थ्यास पाहून आम्ही प्रोग्राम मध्ये घेण्यासाठी तयारी दर्शवितोत.

C) प्रोग्राममध्ये भाग घेण्यासाठी आपणास STUDLURE ॲग्रीमेंट फीस म्हणून रु. १०,०००/- भरावे लागतात. कारण कोणताही करार त्याशिवाय कायद्याने बांधील बनू शकत नाही. त्यानंतर आम्ही आपणास रु. १००/- च्या बॉण्डवर खालील ॲग्रीमेंट नोटराईज्ड करुन देवूत. या ॲग्रीमेंटमुळे तुम्ही १० वी पर्यंत आपल्या मुलाच्या प्रोग्रेसची जराही चिंता न करता ८५% च्या वर मिळवणारच म्हणून निश्चिंत झोप घ्यावयाची आहे.

D) जर आपला पाल्य दरवर्षी ७५% उपस्थित राहिला आणि नियमित फीस भरली तरच सदरील स्कीम लागू असेल.

STUDLURE ॲग्रीमेंट

लिहून घेणार : पालक

लिहून देणार : संस्था

१) कारणे करारनामा लिहून देण्यात येतो की लिहून घेणार यांचा पाल्य Std.......... मध्ये The B.I.S. छ. संभाजी नगर मध्ये शै.वर्ष २०२५-२६ मध्ये प्रवेशित केलेला आहे.

२) लिहून देणार यांनी याद्वारे लिहून दिले आहे की सदरील पाल्यास Std. 10th मध्ये ८५% च्यावर मार्क मिळवून देण्यात येतील अन्यथा नुकसान भरपाई म्हणून आजपर्यंत भरलेल्या एकूण ट्युशन फीसच्या २५% ट्युशन फीस परत दिली जाईल.

३) लिहून देणार यांनी याद्वारे लिहून दिले आहे की सदरील पाल्यास ९५% च्या वर मार्क मिळाल्यास बक्षीस म्हणून ५०% ट्युशन फीस परत दिली जाईल.

४) ८५% ते ९५% मार्क मिळाल्यास काहीही रक्कम परत मिळणार नाही

५) सदरील करारात सहभागी होण्यासाठी लिहून घेणार यांनी सदरील STUDLURE प्रोग्राम फीस म्हणून रु. १०,०००/ भरलेले आहेत. जे नॉन रिफंडेबल असतील. त्याची लिहून देणार यांनी पावती क्र. .... दिलेली आहे.

अशा प्रकारचे अग्रीमेंट आपणास करून दिले जाते. हे सर्व आम्ही १७ वर्षाच्या अनुभवातून विकसित केलेल्या BAP पॅटर्न द्वारे करू शकतोत. ✻ सदरील STUDLURE प्रोग्राम ऐच्छिक आहे.

BAP PATTERN (Basic Academic Practice)

आम्ही आमच्या १७ वर्षाच्या अनुभवातून स्वत: BIS साठी BAP पॅटर्नची निर्मिती केलेली आहे. यामध्ये मुलांचा सर्वांगिण विकास व्हावा या करिता खालील बाबी घेतो. याची रोज तपासणी करण्यासाठी स्वतंत्र सुपरवायझर नेमलेले आहेत. यात ✓ यासाठी मुलांना एक रुपया मिळतो. तर ✗ यासाठी २ रुपये वजा होतात. यासाठी पालकांना रु. २०००/– डिपॉझिट ठेवावे लागतात.

✻ सदरील प्रोग्राम ऐच्छिक आहे. मुलांना पैश्याचे महत्त्व समजावे म्हणून आहे.

BASIC

यामध्ये आम्ही दररोज मुलांचे पाढे पाठांतर, रोज शिकविलेल्या धड्याचे ५ प्रश्नांचे उत्तरे लिहून आणणे. रोज एक पान वाचन घेणे, दररोज इंग्रजी बोलणे या बाबींचा सराव करुन घेतो.

ACADEMIC

यामध्ये आम्ही मुलांच्या होम वर्कच्या वही मध्ये प्रत्येक विषयाचे प्रत्येक पाठाचे जे स्वाध्याय आहेत ते उत्तरासह पूर्ण लिहून घेतो. त्याची इंडेक्स मध्ये मार्क लिहून नोंद घेतोत.

PRACTICE

यामध्ये आम्ही दररोज मुलांकडून मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा विषयाचे एक पान शुद्धलेखन लिहून घेतो. तसेच ३० पर्यंत पाढे लिहून घेतो. तसेच बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकाराचे १० गणिते सोडवून घेतोत.

मुल्यमापन पद्धत

A) अशा रोजच्या अभ्यासाद्वारे त्यांच्या मध्ये त्या त्या वर्गासाठी क्षमता विकसित व्हायला लागतात. त्या आम्ही प्रत्येक वर्गासाठी ४० निर्धीरित केलेल्या आहेत.

B) यानुसार Std. 1 st मध्ये A to Z तसेच 1 to 100 आलेच पाहिजे. यानुसार मराठी, हिंदी, इंग्रजी, गणितच्या प्रत्येकी १० क्वालिटीज अशा ४० क्वालिटीज मुलांमध्ये उतरतात. त्या आम्ही करुन दाखवतो. त्याचे लेखी पेपर घेऊन त्याचे प्रुफ तुम्ही प्रत्यक्षात पाहून खात्री करु शकतात. तसेच व्हॉटसॲपद्वारे ग्रुपवर वेळोवेळी ठेवले जाते. प्रत्येक वर्गखोली बाहेर ४० क्वालिटीची लिस्ट असते.

C) त्यामुळे STDLURE मध्ये 10 वी पर्यंत त्याच्यामध्ये अशा ४०० क्वालिटीज उतरणार तो पारंगत होणार याची आम्ही आपणांस कमिटमेंट देत आहोत.

D) या सिस्टीमद्वारे सतत मुलांना आणि शिक्षकांना इतक्या क्वालिटीज् उतरणे बाकी आहे याची जाणीव होत राहते. पालक पण त्यावर लक्ष देऊ शकतात. विद्यार्थी जिद्द घेऊन या क्वालिटीज मिळवतो म्हणून प्रयत्नात राहतो. यानुसार मुलांचा सर्वांगिण विकास होतो.

E) पालकांशी आम्ही व्हॉटसॲप ग्रुपद्वारे सतत कनेक्टेड राहतोत.

समाजाप्रती जबाबदारी

या भावनेनेच, अंतर्गत प्रेरणेने सदरील शाळा स्थापन केलेली आहे. म्हणून खालील बाबीवर समाजाच्या अडचणी म्हणून ओळखून त्यावर उपाय शोधून खालील सामाजिक बांधिलकी म्हणून आऊटपुट दिले जाते.

१) तुमचा मुलगा अभ्यासात का कच्चा आहे तर त्याचा पाया पक्का नाही. मग काय होते तर त्याला पुढचे अवघड लक्षात बसत नाही. म्हणून आम्ही इथे त्याचा पाया पक्का करण्यासाठी आधी विशेष मेहनत घेतो. त्याला लेखन, वाचन, गणिते आलीच पाहिजेत याची हमी घेतो.

२) मुलांना हॉस्टेल मध्ये इतर मुले त्रास देतात का ? तर त्यांना समानतेचे बाळकडू पालक किंवा शिक्षक पाजत नाहीत. म्हणून आम्ही इथे त्यावरच इलाज करतो. त्यामुळे सगळे विद्यार्थी बंधुभावाने राहतात. इथे मुलांना कुणीही त्रास देऊ शकत नाही.

३) मुलांना हॉस्टेल मध्ये एकटे वाटते. आजारी पडल्यास कुणी लक्ष देईल काय ? या प्रश्नांनी पालक चिंतीत राहतात. इथे असे अजिबात होणार नाही कारण आम्ही सगळे शिक्षक बाबासाहेबांच्या 'भारत बौद्धमय बनवणार' या ध्येयाच्या पूर्तीसाठी कटीबद्ध आहोत. तुम्ही आमच्याकडे सोपवलेले प्रत्येक मुलं आम्हाला बोधीसत्व बनवण्यासाठी दिले आहे या आदराने आम्ही मुलांकडे लक्ष देणार आहोत. जोपसणार आहोत. म्हणून तुम्ही ती चिंता करण्याची गरज नाही.

आम्ही बुद्धिस्ट मिशनरी आहोत. भारत बौद्धमय करायचा आहे या मिशनसाठी काम करीत आहोत.

पालकांना कळकळीचा संदेश

बाबांनो रात्र वैऱ्याची आहे. प्रत्येक जण हुशार झालेले बाबासाहेब बनत नाहीत. तर चाबरे बनून गरीब भोळ्या लोकांना सरळ ऐकत नाहीत तर अंधश्रद्धेत अटकवले की नीट वाटेवर येतात म्हणून देव धर्मात अडकवतात. तुमच्याकडून तुमच्या कष्टाने कमावलेला पैसा नकळत काढून घेण्यासाठी सर्व यंत्रणा बनलेली आहे. त्यात तुमच्या निष्पाप मुलाला सोडणे आहे. त्याचा निभाव लागावा वाटत असेल तर खालील गोष्टी करा.

A) त्याला लाड करत मोबाईल टी.व्ही. बघत घरी पोसू नका. स्वतःच्या पायावर उभा करणेसाठी हॉस्टेलमध्ये टाका.

B) त्याने प्रत्येक गोष्टीसाठी रडल्याशिवाय, त्याला भूक लागल्याशिवाय त्याला काहीही देऊ नका. फक्त तुम्हाला मिळाले नाही म्हणून त्याला देवून त्याला अपंग बनवू नका.

C) त्याला तुम्ही काय दिवे लावले हे सांगू नका. त्याला तुमच्या प्राईम टाईममध्ये समस्या त्याच्या त्याने कश्या सोडवायच्या फक्त एवढे सांगा.

दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कुलच्या महाराष्ट्रातील शाखा

हेड ऑफीस चौका

लाखांदूर शाखा

गोंडपिंपरी शाखा

पिसीएमसी पिंपळे गुरुव शाखा

चामोर्शी आष्टी शाखा

घुग्गुस शाखा

उमरेड शाखा

सोलापूर शाखा

करंजाडे शाखा

पनवेल–कळंबोली शाखा

दि बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कुलची महाराष्ट्र कार्यकारिणी

महाराष्ट्रातील सर्व शाखांचे नियंत्रण करण्यासाठी प्रत्येक तालुक्यात असणाऱ्या शाखेचे शाखाध्यक्ष हे तेथील पदसिद्ध कौन्सील मेंबर असतात. BIS च्या व्यवस्थापनासाठी प्रत्येक तालुक्याला एक BIS ची कौन्सील समजली जाते. त्या कौन्सीलच्या प्रमुखास कौन्सील मेंबर म्हटले जाते. अशा सर्व कौन्सील मेंबर्समधून सर्वात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या १५ जणांची कोर कमिटी बनते. या सर्वांची महिन्यातून एकदा बैठक मुख्यालयात होते. ती प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या रविवारी असते.

आयु. रामनाथ चांदेकर
गोंडपिंप्री

आयु. करुणा माटे
उमरेड

आयु. धिरांजली चांदेकर
चंद्रपूर

आयु. माधव शिंदे
पंढरपूर

आयु. नितीन सोनवणे
छ.संभाजीनगर

आयु. अजित गायकवाड
मावळ

आयु. समीर आंबेडकर
चामोर्शी

आयु. प्रमिला बगळे
जालना

आयु. ॲड. अनंत कांबळे
पुसद

आयु. बलदेव इंगळे
फुलंब्री

आयु. किरण कांबळे
कराड

आयु. सुचित मोरे
वाई

आयु. दिपक रणदिवे
शिरुर

आयु. ॲड. संदीप उडाणशिव
सोलापूर


आयु. प्रा. अरविंद साळवे
पीसीएमसी हवेली

आयु. रेखा टेकळे
मुळशी

आयु. ॲड. गीता निकाळजे
धाराशिव

आयु. नागसेन भगत
घुग्गुस

आयु. शरद पखाले
मालेगाव

आयु. प्रदीप कांबळे
पनवेल

आयु. महेंद्र बारसागडे
लाखांदूर

आयु. डॉ. अभिजीत मनवर
कळमनुरी

आयु. डॉ. सिद्धार्थ तांबे
ओरस

आयु. रविंद्र इंदवे
उल्हासनगर

आयु. आदित्य साळवे
पीसीएमसी, खेड